# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

## कुलसचिव कार्यालय

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली - ४४२६०५

### जाहिरात (दुसरी वेळ)

**जाहिरात क्र. ४०/२०२१** **दि.१६/१२/२०२१**

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली करीता विधी अधिकारी पद मानधन तत्वावर भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडुन विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहे.

| पदनाम | पदांची संख्या | मानधन | नियुक्तीचा कालावधी |
|---|---|---|---|
| विधी अधिकारी (Legal Officer) | ०१ | एकूण प्रतिमाह रू. ५०,०००/- (एकत्रीत मानधन तत्वावर) | ११ महिने |

वरील पदाकरीता आवश्यक शैक्षणिक व संगणकीय अर्हता, अनुभव, वय ईत्यादीबाबतची माहिती तसेच अर्जदारासाठी आवश्यक सुचना आणि आवेदन पत्राचा विहीत नमुना विद्यापीठाच्या **www.unigug.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध असून अर्जाच्या विहीत नमुन्यातच अर्जदाराने **कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली** यांचेकडे **दिनांक २२/१२/२०२१** रोजी सायंकाळी ०५.३० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत अर्ज सादर करणे बंधनकारक आहे.

स्वा/-

(डॉ. अनिल चिताडे)

कुलसचिव (प्र.)

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

कुलसचिव (प्र.)

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**"विधी अधिकारी" पद मानधन तत्वावर भरण्याकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता व आवश्यक सुचना.**

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| ०१ | **विधी अधिकारी** **(Legal Officer)** एकूण प्रतिमाह रू. ५०,०००/- (एकत्रीत मानधन तत्वावर) | उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कायद्याचा पदवीधर व भारतीय विधी परिषद तर्फे नोंदणीकृत व सनद धारक असावा. |

**वरील पदांकरीता आवश्यक वयोमर्यादा व सर्वसाधारण सुचना खालीलप्रमाणे.**

- **वयोमर्यादा**
  १. उमेदवारासाठी किमान वयोमर्यादा १८ वर्षे पुर्ण.
  २. सेवानिवृत्त कर्मचारी यांचेकरीता वयाची अट लागु नाही.
  ३. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील अनुसूचीमध्ये उल्लेख करण्यात आलेली विद्यापीठे व त्यांची संलग्नित महाविद्यालये आणि शासन मान्यताप्राप्त संस्थेत नियमीत/कायम पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी वयाची अट लागू राहणार नाही.

- **अर्जदारांसाठी सर्वसाधारण सूचना**
  उमेदवारांनी आपले अर्ज भरण्याआधी व पाठविण्यापूर्वी त्याची शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय इत्यादी वरील बाबी पडताळून पाहाव्यात. तसेच खालील सूचना व अटींचे लक्षपूर्वक वाचन करावे.

१) **विधी अधिकारी** हे पद (एकुण प्रतिमाह रू.५०,०००/-) एकत्रित मानधन तत्वावर, ११ महिन्याच्या कालावधीकरीता नियुक्ती असेल. तद्नंतर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. काम समाधानकारक असल्यास मुदतवाढ देण्याचा निर्णय विद्यापीठ प्रशासनाचा राहिल.

२) नियुक्ती कालावधीत नियुक्ती ठिकाणी सोपविलेले काम पुर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत अधिकाऱ्यांची राहिल.

३) सदर जाहिरातीतील निवड प्रक्रिया हे विद्यापीठ प्रशासनाच्या अधिनस्त राहील.

४) सदर जाहिरातीतील सुचनांमध्ये आवश्यकतेनुसार फेरबदल करण्याचे अधिकार विद्यापीठाने राखून ठेवलेले आहेत.

५) सदर जाहिरातीतील पदासाठी छाननीअंती पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची संख्या विचारात घेऊन मुलाखत घेण्याचा निर्णय विद्यापीठ प्रशासनाव्दारे आवश्यकतेनुसार घेण्यात येईल. सदर निर्णय उमेदवारांना बंधनकारक राहील.

६) उमेदवारांनी विद्यापीठाच्या **www.unigug.ac.in** या संकेतस्थळावरून उपलब्ध असलेल्या विहीत नमुन्यामध्येच टंकलिखीत, हस्तलिखीत किंवा संगणकिय प्रिंट केलेला अर्ज ०५ **प्रतीत (सहपत्रासह)** सादर करावा.

७) विहीत नमुन्यातील अनुक्रमांकामध्ये/रकान्यामध्ये कुठलाही बदल करू नये. अर्ज भरतांना रकाने किंवा ओळी कमी पडत असल्यास अधिकची माहिती स्वतंत्र कागदावर द्यावी व तसे अर्जात योग्य त्या ठिकाणी नमुद करावे.

८) अर्जदाराने अर्जाच्या विहीत नमुन्यात दर्शविलेल्या स्थानी स्वत:चा स्वसांक्षाकित केलेला फोटो लावावा.

९) अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय, इत्यादी आवश्यक व लागू असलेल्या प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती स्वसाक्षांकित करून जोडाव्यात. अर्जासोबत मुळ प्रमाणपत्रे जोडू नयेत.

१०) सदर पदाकरीता अर्ज करतांना लिफाफ्यावर "**विधी अधिकारी** " या पदाकरीता अर्ज असे लिफाफ्यावर लिहून दिनांक **२२/१२/२०२१** रोजी सायं. ०५.३० वाजेपर्यंत **"कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली पिन ४४२६०५"** यांच्याकडे उपरोक्त नमुद केलेल्या तारखेपर्यंत प्राप्त होणे आवश्यक आहे.

११) शासकिय सेवेत कार्यरत असलेल्या अर्जदारांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालयामार्फत (Through Proper Channel) सादर करण्याच्या अंतिम तारखेपर्यंतच म्हणजेच दिनांक **२२/१२/२०२१ रोजी** सायं. ०५.३० वाजेपर्यंत सादर करावयाचे आहे. उपरोक्त मुदतीत प्राप्त न झालेले अर्ज रद्द ठरविण्यात येतील.

१२) अपूर्ण, चुकीची माहिती भरलेले, विहीत नमुन्यात नसलेले, आवश्यक शैक्षणिक अर्हता नसलेले, वयोमर्यादेत मोडत नसलेले, अर्जासोबत अर्हता, अनुभव, वय, इत्यादींच्या छायांकित स्वसाक्षांकित नसलेल्या प्रती, न जोडलेले अर्ज, टपालखात्याच्या दिरंगाईमुळे अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव उशीरा प्राप्त झालेले अर्ज, इत्यादी त्रुटी असलेले अर्ज तसेच सर्व प्रमाणपत्रासह ०५ प्रतीमध्ये नसलेले अर्ज नाकारण्यात येतील व त्याबाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

१३) अर्जदाराची शैक्षणिक पात्रता व वय हे अर्ज सादर करण्याच्या अंतिम तारखेपर्यंत ग्राह्य धरण्यात येईल.

१४) उमेदवार हा शारिरीक दृष्ट्या सक्षम असावा. तसेच अर्जदाराविरुद्ध कोणताही फौजदारी गुन्हा झालेला नसावा.

१५) अर्जाच्या छाननी अंती अर्जदार अपात्र ठरल्यास याबाबतची माहिती संबंधीत अर्जदारास स्वतंत्ररित्या कळविली जाणार नाही.

१६) उमेदवारांनी भरती प्रक्रियेत विद्यापीठाशी संबंधीत अधिकारी व सेवकांवर कोणत्याही प्रकारचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष दडपण तथा राजकिय किंवा सामाजिक दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास अथवा अप्रत्यक्ष संपर्क साधण्याचा प्रयत्न केल्यास, अशा उमेदवारास अपात्र समजले जाईल.

१७) मुलाखतीस बोलविलेल्या अर्जदारांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

१८) विद्यापीठ प्रशासनाव्दारे आयोजित मुलाखतीस पाचारण करण्यात येणाऱ्या संबंधीत उमेदवाराची ठराविक दिवशी प्रशासनाच्या कोणत्याही अडचणीमुळे मुलाखत पार न पडल्यास अशा संबंधीत उमेदवारांची प्रशासनाच्या निर्देशान्वये इतर दिवशी मुलाखत आयोजित करण्यात येईल व त्याकरीता मुलाखतीस संबंधीत उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

१९) निवड प्रक्रिया सूरू झाल्यानंतर किंवा नियुक्ती उपरांत उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे सादर केल्याचे किंवा माहिती लपवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची निवड/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल व तो उमेदवार कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

२०) अर्जदाराला अर्जामध्ये दिलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्यात बदल करावयाचा असल्यास याबाबत कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना त्वरीत कळवावे लागेल.

२१) निवड झालेल्या उमेदवारांना गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथील कायम सेवेकरीता हक्क सांगता येणार नाही.

दिनांक :- १६/१२/२०२१
ठिकाण :- गडचिरोली.

(डॉ. अनिल चिताडे)
कुलसचिव (प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली